शिक्षक प्रशिक्षण या केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील सर्वसाधारण लेखाशीर्षातंर्गत केंद्र शासनाच्या दुसऱ्या हप्त्यामधील उर्वरित निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः अनुवि- ४११७/(८६/१७)/प्रशिक्षण
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
तारीख: ३१ मार्च, २०१८

वाचा -

१. मनुष्यबळ व विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ ४४-०७/२०१७-ईई-९, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८.
२. शासन निर्णय क्र.अनुवि-४९१७/(३२/१७)/अर्थसंकल्प, दि.२० मार्च, २०१८
३. शासन निर्णय क्र.पुनर्वि-२८१७/(प्र.क्र.५३/१७)/अर्थसंकल्प (२), दि.३१ मार्च, २०१८

प्रस्तावना -

केंद्र शासनाने सन-२०१७-१८ पासून केंद्र पुरस्कृत योजनांच्या केंद्र व राज्य हिश्याचे प्रमाण बदलले असून, केंद्र-राज्य हिश्याचे प्रमाण ६०:४० असे निश्चित केले आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाने शिक्षक प्रशिक्षण या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत सर्वसाधारण लेखाशीर्षातंर्गत दि.२३ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये दुसरा हप्ता वितरीत केला आहे. त्यानुसार सन २०१७-१८ मध्ये सर्वसाधारण लेखाशीर्षातंर्गत (२२०२३०२९) अर्थसंकल्पीत असलेला शिल्लक निधी दि.२० मार्च, २०१८ शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. तथापि, सदर लेखाशीर्षातंर्गत रु.१८१.७६ लाख इतका निधी कमी पडत असल्याने केंद्र शासनाने वितरीत केलेला पूर्ण निधी वितरीत केलेला नव्हता. रु.१८१.७६ लाख इतका निधी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करण्यात आला असून, सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

शिक्षक प्रशिक्षण या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत सर्वसाधारण लेखाशीर्षाखाली केंद्र शासनाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता दुसरा हप्ता रु.३८०.०० लाख शासनास वितरित केलेला आहे. त्यानुसार संदर्भ क्र.२ येथील दि.२० मार्च, २०१८च्या शासन निर्णयान्वये रु.३८०.०० लाख मधील सर्वसाधारण लेखाशीर्षातंर्गत (२२०२३०२९-केंद्र हिस्सा) अर्थसंकल्पीत असलेला शिल्लक निधी रु.१९८.२४ लाख निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित कमी पडत असलेला केंद्र हिस्सा रु.१८१.७६ लाख इतका निधी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करण्यात आला असून, खालील विवरणपत्रानुसार वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

लेखाशीर्ष	केंद्र शासनाच्या पत्राचा दिनांक	केंद्र शासनाने वितरीत केलेला निधी	सदर हिश्यामधून वितरीत केलेला निधी	उर्वरित वितरीत करावयाचा निधी
General Head (केंद्र हिस्सा) (२२०२३०२९)	दि.२३/०२/२०१८ (दुसरा हप्ता)	३८०.००	दि.२० मार्च,२०१८ शा.निर्णयान्वये रु.१९८.२४	१८१.७६

केंद्र शासनाने सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी वितरीत केलेल्या दुसऱ्या हप्त्याकरिता पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करण्यात आलेला केंद्र हिस्सा रु.१८१.७६ लाख इतका निधी **“मागणी क्र.ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण, ००३-प्रशिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०१)(०३) शिक्षकांचे प्रशिक्षण (केंद्र पुरस्कृत योजना)(केंद्र हिस्सा) (२२०२३०२९)** या लेखाशीर्षातून सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदीतून वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी व संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, ज्या उद्दिष्टासाठी सदर निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.३८०/२०१८/व्यय-५, दि.३१/०३/२०१८ अन्वये दिलेली मान्यता तसेच, अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३,दि.३०/०६/२०१७ व दि.०८/०८/२०१७ च्या परिपत्रकामधील अटी व शर्तींच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३१२१०१५४२५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Baban Ranganath Mali

Digitally signed by Baban Ranganath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=058a3365edca1bab7b5a512fa9b602a739d12b55819b89fd7154a7a28ccbaa1e, serialNumber=d2974b67a90018e618d5e11ffd00382f063542cc3d866753cfd5a4ad652b1908, cn=Baban Ranganath Mali
Date: 2018.03.31 21:02:49 +05'30'

(बी.आर.माळी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र शासन, पुणे
३. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)महाराष्ट्र राज्य, पुणे
४. संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे
५. संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे
६. संचालक (प्रौढ व अल्पसंख्याक) महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१/२), मुंबई/नागपूर
११. महालेखापाल (लेखा परिक्षा), १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/नागपूर.
१३. सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक व्यवसाय सातत्यपूर्ण विकास संस्था (DIECPD)

१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१५. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६. वित्त विभाग (व्यय-५/अर्थसंकल्प-८), मंत्रालय, मुंबई.

१७. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मंजूर रक्कम बी.डी.एस.प्रणालीवर तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

१८.निवडनस्ती (प्रशिक्षण).